नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २४/०९/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## खून

**पो.स्टे. बोरी :—** अंतर्गत ०५ कि. मी अंतरावरील बुटीबोरी ते वर्धा रोड, रूईखैरी शिवार, निको कॉलनी, क्वॉटर नं.ई येथे दिनांक २२/०९/२०२२ चे १९.३० वा. दरम्यान किशोर प्रधान (जखमी), हा आरोपी क्र. १. लखविंदर पात्र यास त्याला गावी जाणे असल्याने कामाचे पैसे मागत असल्याने दोघांचा वाद झाला. त्यावेळी फिर्यादी नामे— सौम्य दशरथ प्रधान, वय २० वर्ष, हिन्दु ग्राम राज्यंक्या पोस्ट कमागुर त.रणपुर जि. नयागड (उडीसा) ह.मु. क्वार्टर नं. ई निको कॉलनी वर्धा रोड व त्याचे वडील त्याचां वाद मिटविला. घटना ता. वेळी ठेकेदार यांनी जखमी किशोर प्रधान यास सुपरवायजर व्दारे कामाचे पैसे देवुन कंपनी गेट मधुन बाहेर सोडले असता जखमी किशोर प्रधान हा कंपनीचे मागील जंगल रस्त्याने कॉलनी मध्ये परत येवुन फिर्यादी त्याचे वडील दशरथ प्रधान, रविंन्द्र नायक सह राहत असलेल्या खोलीत येवुन झोपला. फिर्यादी हे त्याचे सोबतचे राकेश नायर, प्रकाश मांझी सह कंपनी गेट कडे नळाला पाणी आल्याने पाणी आणण्यासाठी गेला व फिर्यादीचे वडील दशरथ प्रधान, काका रविन्द्र नायर, किशोर प्रधान असे रूम वर असतांना यांतील आरोपी क्र. १) लखविंदर पात्र, २) जनक शाहु, ३) क्रिष्णा शाहु, ४) शुभम पात्र सर्व रा.उडीसा यांनी किशोर प्रधान हा फिर्यादीचे रूमवर परत आला असल्याचे माहीती पडल्याने वरिल जुने वादातुन आरोपी हे रात्री ०७.०० ते ०७.३० वा सुमारास फिर्यादीचे रूमवर येवुन किशोर प्रधान याचे सोबत वाद करून मारहाण करित असल्याने फिर्यादीचे वडील दशरथ प्रधान, काका रविंन्द्र नायक हे झगडा सोडविण्यास मधात गेले असता आरोपीतांनी लोखडी सरिया व धारदार चाकुने दशरथ प्रधान, रविंन्द्र नायक यांना डोक्याला व किशोर प्रधान यास लोखंडी सरीयाने तोंडाला मारूण गंभीर जखमी करून फिर्यादीचे वडील दशरथ नोचन प्रधान, वय ५० वर्ष, रा. हिन्दु ग्राम राज्यंक्या पोस्ट कमागुर त.रणपुर जि. नयागड (उडीसा) ह.मु. क्वार्टर नं. ई निको कॉलनी वर्धा रोड यांचा खुन केला व रविन्द्र नायक, किशार प्रधान यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे फिर्यादीचे तक्रारीवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, ३०७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री भिमाजी पाटील मोनं ८९९९९४१७०९ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कोंढाळी —** दिनांक २२/०९/२२ चे १७.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कोंढाळी हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि बारंगे मो.नं ९५२७४७५२१७ या करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** – अंतर्गत ०६ कि.मी अंतरावरील मौजा भामेवाडा ते जाखेगाव रोड येथे दिनांक २२/०९/२२ चे २०.०० वा. ते दिनांक २३/०९/२२ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी शेषराव निलकंठ तितरमारे वय ३५ वर्ष्र, रा. प्लॉट नं १६ योगेश्वर नगर, दिघोरी नागपुर याला दि २३/९/२२ रोजी दुपारी ०१.०० वा. दरम्यान डयुटीवर वडोदा येथे हजर असता जाखेगाव एरीयातील लाईनमेन श्री अतुल वानखेडे यांनी फोन करुन माहीती दिली की, भामेवाडा ते जाखेगाव रोडवरील ११ केवी विजवाहीनी चे अंदाजे २.५ किलोमिटर चे खब्यावरील तार कापलेले दिसत आहे कोणी तरी चोरुन नेले असावे असे सांगीतले वरुन यातील फिर्यादी हा भामेवाडा व जाखेगाव रोड वर जावुन पाहीले असता ४२ पोल वरील अल्युमिनीयम तार अंदाजन १०५० कीलो अंदाजे किंमती ८०,०००/–रु. चा माल चोरी गेलेला दिसला अज्ञात आरोपीने सदरचा माल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गौतम मेश्राम मो. क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :– अंतर्गत १३ कि.मी अंतरावरील मौजा पेंढरी शिवार विटा भटटा येथे दिनांक २४/०४/२२ चे २०.०० वा ते २५/०४/२२ चे १४.०० वा दरम्यान संशईत आरोपी ट्रक क्र.१. एम.एच– ४०/बी.जी–०१५३ चा चालक व मालक, २. एम.एच– ३१/सी.वो–१०९७ चा चालक व मालक यांनी फिर्यादी नामे– विनोद राधेशाम गुप्ता वय ४० वर्ष, रा. सावनेर यांचे मालकीचे टिप्पर ट्रक क्र. १. एम.एच– ४०/बी.जी– ५०५१ चे मागचे ०४ टायर, २.एम.एच– ४०/बी.जी– ६२१५ चे मागचे ०४ टायर व स्टेपनी टायर, ३. एम.एच– ४०/वाय– ८६१९ मागचे ०४ टायर असे एकुण १३ नग कॉन्टीनेटर कंपनीचे नविन टायर किमती ३,१८,०००/–रू. चा माल चोरी करून जूने टायर लावले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेण सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे मो.न.९९२३९०८३८२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**